ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# औरंगजेब बादशहाच्या ब्रम्हपुरी छावणीतील घटनाः एक दृष्टीक्षेप

प्रा. शिंदे विकास विलासराव
माऊली महाविद्यालय, वडाळा
ता. उ. सोलापूर जि.सोलापूर (महाराष्ट्र)

## प्रस्तावना :



मध्ययुगीन काळात दिल्ली या ठिकाणी मोगलांची सत्ता होती. १७ व्या शतकाच्या मध्यानंतर दिल्लीचा बादशहा औरंगजेब सत्तेवर होता. औरंगजेब बादशहा हा उतरेत इ.स. १६८१ पर्यंत होता. उत्तर भारतात मोगलांचा रजपूतांशी संघर्ष चालू असताना औरंगजेबाचा मुलगा शहाजदा अकबर यांने दुर्गादास राठोडच्या मदतीने बादशहा विरोधी बंड करुन तो दक्षिण भारतात संभाजी राजाच्या आश्रयाला आला. औरंगजेबाने दक्षिणेतील आदिलशाही कुतूलशाही व मराठीसत्ता नष्ठ करण्यासाठी व अकबराचे बंड मोडण्यासाठी इ.स. १६८१ मध्ये तो दक्षिण भारतात आला आणि मृत्युपर्यंत दक्षिण भारतातच राहिला.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी राजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले. जोपर्यंत शिवाजी राजे अस्तित्वात होते तोपर्यंत औरंगजेब बादशहा दक्षिणेत आला नाही. शिवाजी राजांच्या मृत्युनंतर मराठी सत्तेचा छत्रपती म्हणून संभाजीराजे गादीवर आले. संभाजी राजांनी शहाजादा अकबराला आश्रय दिला असल्याकारणाने औरंगजेब व संभाजी राजे यांच्या संघर्षाला सुरुवात झाली. औरंगजेबाबरोबर सतत नऊ वर्ष लढा संभाजीराजांनी दिला शेवटी निजामशेख या सरदाराने संभाजी राजानां कैद करुन औरंगजेब बादशहाने हालहाल करुन ११ मार्च १६८९ रोजी ठार मारले. त्यानंतर मराठयांची राजधानी रायगड घेण्यासाठी जुल्फीकारखान यास पाठविले त्याने रायगड सर करुन महाराणी येसुबाई व शाहू यानां कैद केले परंतू मराठयांचा छत्रपती राजाराम सुखरुपणे बाहेर पडले व त्यांनी जिंजीला प्रयाण केले. त्यानंतर औरंगजेब बादशहाने मराठयांचे अनेक किल्ले जिंकून घेतले. तत्पुर्वी संभाजी काळात १६८६ ला आदिलशाही व १६८७ ला कुतुबशाही नष्ठ केली.

## * औरंगजेब बादशहाची छावणी ब्रम्हपूरी व तेथील घटना -

हिंदूस्थानची मोगलांची राजधानी सोलापूर जिल्ह्यात कधी होती का? हा प्रश्न विचारला तर आपण म्हणतो दिल्ली होती पण दक्षिणेत औरंगजेब बादशहाने ब्रम्हपुरी याठिकाणी आपली चार वर्षासाठी या राजधानीची निवड केली होती. ब्रम्हपुरी ऊ र्फ इस्लामपूर या ठिकाणी औरंगजेब बादशहाने इ.स. १६९५ ते इ.स. १६९९ या काळात ब्रम्हपुरी या ठिकाणी छावणी करुन मोगल सत्तेची सर्व सुत्रे या ठिकाणावरुन हालवली ब्रम्हपुरी या ठिकाणी मोगलांचे तीन लाख लष्कर सर्व खजिना, कारखाने, राज्याचा पत्रव्यवहार, जमान खाना, राजकीय हालचाली , मोहिमांचे नियोजन या ठिकाणावरुन चार वर्ष चालत होते.

औरंगजेब बादशहाने विजापूरचा अलीअदील शहा , गोवळकोंडयाचा अब्दुल हसन कुतुब शहा व मराठयांचा युवराज शाहू, संभाजी पत्नी येसुबाई व शिवाजी राजांची पत्नी सकवर बाई यांना ब्रम्हपूरी या छावणीत बादशहाच्या शेजारच्या तंबू शेजारी चार वर्ष कैद करुन ठेवले होते. त्या कैद केलेल्या जागेला 'गुलालबार असे म्हणत ब्रम्हपूरी या ठिकाणी औरंगजेब बादशहाने आपला पूर्ण जनाना युवराज, कांबक्ष, आज्जम, मुअज्जम, हे राजपुत्र तसेच आसद खान जुल्फीकार खान, तोफखाना प्रमुख तर्बीया खान हैद्राबाद घराण्याचा संस्थापक निजाम व इतर सर्व सैनिक ब्रम्हपुरी या ठिकाणी वास्तव्य करीत होते.

ब्रम्हपुरी छावणीचा व राज्यकारभाराचा खर्च भागविण्यासाठी हिंदूस्थानातून खजिना या ठिकाणी येत होता. हा खजिना औरंगाबाद, परांडा, बार्शी, मानेगाव, मलीकपेठ, मोहोळ, व ब्रम्हपुरी या मार्गे येत असे तसेच औरंगाबाद तुळजापूर , सोलापूर तिऱ्हे व ब्रम्हपूरी यामार्गेही येत होता. हा खजीना व रसद व्यवस्थीत यावी म्हणून औरंगजेब बादशहाने संरक्षक पथके अनेक ठिकाणी ठेवण्यात आली होती. तरी सुध्दा

मराठयांनी मोगलाची रसद व खनीजा उंदरगाव, देवगांव, मानेगाव, काटी, नळदुर्ग व तुळजापूर या ठिकाणी लुटण्यात आलेची कागदपत्रात नोंद आहे.

औरंगजेब बादशहाने राजारामचा बंदोबस्त करण्यासाठी व जिंजी स्वारीचे नियोजन व नेमणूक याच ठिकाणी ठरविण्यात आली होती. मोहिमेवर जाण्यासाठी जुल्फीकारखान आसद खान व शहाजादा कामबक्ष यांची नेमणूक ब्रम्हपुरी छावणीतून केली होती. ब्रम्हपुरी या ठिकाणी असताना मराठयांच्या संताजी घोरपडे व धनाजी जाधव या सरदारांनी मोगलांची अवस्था वाईट केली होती. या सरदारांनी मोगलांचे काशिमखान हिम्मत खान, मामुरखान, शबाअुद्दीन खान व जुल्फीकारखान यांची अवस्था गनिमी कावा पध्दतीने लढून वाईट केली होती.

ब्रम्हपूरी या ठिकाणी औरंगजेब बादशहाने संभाजी पुत्र शाहू यांचा विवाह आपला मोगल सरदार रुस्तुम खान जाधव यांच्या मुलीशी म्हणजे अंबिकाबाई यांच्याशी ब्रम्हपूरी येथील महादेवाच्या मंदीरात लावण्यात आला. हा सोहळा आठ दिवस चालला या सोहळयासाठी औरंगजेब बादशहाने १ लाख रुपये खर्च केले तसेच शाहू राजांना अक्कलकोट व नेवासे येथील महाल आंदन दिले. शिवाजी राजांची पत्नी सुकवरबाई यांची कैदेतून सुटका करण्यासाठी येसुबाई व दुर्गादास राठोड यांच्या प्रयत्नामुळे ब्रम्हपुरीतून सुटका झाली.

ब्रम्हपुरी या ठिकाणी रजपूत सरदार दुर्गादास राठोड व औरंगजेब या दोघांची भेट ईश्वरदास नागर यांनी इ.स. १६९६ मध्ये घडवून आणली. कारण औरंगजेब बादशहाचा मुलगा शहाजादा अकबर इ.स. १६८७ ला इराणला पळून गेला पण त्याची मुले दुर्गादास राठोड यांच्याकडे ठेवण्यात आली होती. आपल्या नातवांची भेट व्हावी म्हणून औरंगजेब बादशहाने खूप प्रयत्न करुन ईश्वरदासाच्या मदतीने नातू परत मिळवले ते ब्रम्हपूरी या ठिकाणीच. दुर्गादास राठोड वरुन प्रसन्न होऊन ब्रम्हपुरी या ठिकाणी औरंगजेब बादशाहाने त्यास तीन हजाराची मनसबदारी हिरे जवारत व १ लाख रुपये बक्षिस दिले. या सर्व घटनेला साक्षीला ब्रम्हपुरीच आहे.

मराठयांचा शूर सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचे संबंध बिघडले कारण संताजीने धनाजी जाधवाच्या सैन्यातील अमृतराव निंबाळकर यांना ठार मारले आणि अमृतराव निंबाळकर हे नागोजी माने यांचे मेव्हणे असल्याकारणाने माने मोगलांना मिळाले तर राजाराम महाराजांनी सेनापती पद हे संताजी ऐवजी धनाजी जाधवाला दिले. पुढील काळात संताजीची अवस्था अत्यंत वाईट झाली डोंगर दऱ्यामध्ये फिरत असताना आणि त्याच्या मागावर असलेले नागोजी माने यांनी म्हसवड या ठिकाणी मान नदी मध्ये अंघोळ करीत असताना संताजी घोरपडे यांच्यावर छापा टाकून ठार मारले. व ही बातमी औरंगजेब बादशहास ब्रम्हपुरीस सांगितले. बादशहाच्या आज्ञेवरुन संताजीचे शरीर ब्रम्हपुरी या ठिकाणी आणून त्याचे डोके धडावेगळे करुन ब्रम्हपुरी छावणीत फिरवीण्यात आले. बादशहाने प्रसन्न होऊन नागोजी माने यांना 'खुशखबरखान' ही पदवी देऊन म्हसवड इस्लामपूर व नातेपुते ही गावे इनाम दिली. या सर्व प्रकाराला ब्रम्हपुरी साक्षीला होती.

औरंगजेब बादशहाला भिमानदीच्या पुराचा तडाखा अनेक वेळा बसला जुलै १६९७ रोजी अती महापुर आल्याने मोगलांचे लष्कर साहित्य व अनेक माणसे वाहून गेली. बहादूर गडावरुन अनेक माणसे ब्रम्हपुरीला वाहून आली. बादशहाने कशीबशी आपली छावणी उंच वटयावर घेऊन गेले. ब्रम्हपुरी शेजारी माचणूर या ठिकाणी महादेवाचे मंदीर असून ते उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच भिमा नदीच्या किंवा मंदीराच्या कडेला सुरक्षित तटबंदी केली होती. तसेच बेगमपूर या ठिकाणी एक टेहळणी बुरुज निर्माण केला होता. आपल्या बेगमासाठी बेगम महल निर्माण केलेला होता. माचणूर या ठिकाणी निजाम वुल मुल्ख यांची आजीचे थडगे आहे तसेच औरंगजेबच्या मुलीची कबर स्थान आहे असे सांगितले जाते. पण ते चुकीचे आहे. औरंगजेब बादशहाने महापूरमुळे भिमा नदीचा प्रवाह बदलून माचणूरच्या मंदीराकडे वळवलेला आहे. अशी नोंद कादपत्रात आहे. तसेच औरंगजेब बादशहा इद निमित्त नमाजासाठी सोलापूर येथील जुम्मा मशिदीत जात असे. जात असताना त्याचा मार्ग ब्रम्हपुरी वाघोली कामती तिऱ्हे सोलापूर असे तर मंगवेढा येथील गैबी पिराच्या दर्शनास औरंगजेब बादशहा जात असे.

औरंगजेब बादशहा दक्षिणेस आल्यानंतर आपल्या २५ वर्षापैकी सर्वात जास्त काळ ब्रम्हपूरी ऊर्फ इस्लामपूमर या ठिकाणी घालवीला या ठिकाणावरुन हिंदूस्थानचा तमाम राज्यकारभार व मोहिमांचे नियोजन केले ब्रम्हपुरी या छावणीत मराठयांच्या इतिहासातील शाहू विवाह सकवरबाई यांची सुटका, दुर्गादास राठोड भेट, नातवांची भेट, जिंजी मोहिमेचे नियोजन, संताजी घोरपडे यांचे डोके फिरवीणे, सोलापूर भेट अशा अनेक घटना मोगल बादशहा औरंगजेब यांची ब्रम्हपूरी छावणीत घडलेल्या दिसून येतात. ब्रम्हपूरी सोडल्यावर सहा महिने त्यांचा परिवार या ठिकाणीच होता. ब्रम्हपुरीतून गेल्यानंतर खवासपूर या ठिकाणी औरंगजेब पडला व आयुष्याचा लंगडा याठिकाणी झाला. तो शेवट पर्यंत लंगडतच राहिला. अशा प्रकारे सोलापूर जिल्ह्यातील औरंगजेब बादशहाची ब्रम्हपूरी छावणेतील घटनेचा मागोवा या ठिकाणी केला आहे.

*** संदर्भ ग्रथ**


१) सोलापूर जिल्ह्याचा इतिहास - रेणू प्रकाशन - गोपाळ देशमुख
२) सोलापूर जिल्ह्याची बखर - रेणू प्रकाशन - गोपाळ देशमुख
३) मराठी रियासक - स्थिरबुध्दीराजाराम - गो.स. सरदेसाई
४) मोगल दरबाराची बातमीपत्रे - सेतू माधवराव पगडी
५) मराठे व औरंगजेब - अनु - सेतू माधवराव पगडी
६) सोलापूर गॅझेटीयार महाराष्ट्र शासन
७) History of Auranjzib/ sir jadunath sarkar